प्रातःकाल
www. pratahkal.com

संपादकीय

सरन्यायाधीशांकडून अपेक्षा!

भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्ना यांची झालेली निवड भारतीय न्यायव्यवस्थेतील महत्त्वाची घटना म्हणावी लागेल. आजवर भारतीय न्यायव्यवस्था सुदृढ व सशक्त करण्याचे काम अनेक न्यायाधीशांनी प्रामाणिकपणे पार पाडले आहे. आता हीच जबाबदारी न्या. खन्ना यांच्यावर येऊन पडली आहे. न्या. खन्ना यांना सहा महिने आणि एक दिवस इतका कालावधी मिळेल. पुढच्या वर्षी म्हणजे २०२५ साली १३ मे रोजी ते निवृत्त होतील. न्या. खन्ना यांचा कार्यकाळ कमी असला तरी सरन्यायाधीशपदी निवड झालेले खन्ना यांचा कार्यकाळ त्यांची क्षमता, त्यांची न्यायिक तत्त्वं आणि भारतीय न्यायव्यवस्थेच्या मर्यादा बघता कसा असेल याची सर्वांनाच उत्सुकता आहे. २००५ मध्ये न्या. खन्ना यांची हायकोर्टाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. फेब्रुवारी २००६ मध्ये ते पूर्णवेळ न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले. त्यांनी जवळजवळ २३ वर्षं वकिली केली. आधी ते दिल्लीच्या तीस हजारी कॉम्प्लेक्समधील जिल्हा सत्र न्यायालयात होते, त्यानंतर दिल्ली हायकोर्टात वकील होते. त्याचबरोबर कर, लवादाची प्रकरणं, कंपनी कायदा, भूमी अधिग्रहण, आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित अनेक ट्रिब्युनल्समध्ये त्यांनी काम केलं. ते प्रत्यक्ष कर विभागाचे वकील होते. त्यांनी राष्ट्रीय राजधानी परिसराचंही प्रतिनिधित्व केलं. त्यानंतर त्यांची हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यांची आतापर्यंतची कारकीर्द पाहता, ते फारसे लोकांमध्ये मिसळणार नाहीत असं दिसतं. खरंतर ते भूषवत असलेल्या पदावरच्या व्यक्तीने सार्वजनिक व्यासपीठावर बोलणं, त्याचप्रमाणे राजकीय नेत्यांबरोबर सार्वजनिक कार्यक्रमात असणं अपेक्षित असतं. सुप्रीम कोर्टात असलेल्या रोस्टर पद्धतीमुळे सरन्यायाधीशांवर कायमच सार्वजनिकरीत्या टीका होते. रोस्टर (वेळापत्रक) पद्धतीचे प्रमुख म्हणून सुप्रीम कोर्टाच्या सर्व न्यायाधीशांच्या वेळापत्रकाची जबाबदारी सरन्यायाधीशांची असते. रोस्टर पद्धतीने वेगवेगळ्या न्यायाधीशांना त्यांच्या उपलब्धतेनुसार आणि ज्येष्ठतेनुसार संगणकीकृत पद्धतीने केसेस दिल्या जातात. मात्र या केसेसच्या वाटपात 'मास्टर ऑफ रोस्टर' म्हणजेच सरन्यायाधीश वेळोवेळी बदल करत असतात. त्यामुळे त्यांचे अधिकार अनियंत्रित आहेत, तसंच कार्यकारी मंडळाच्या बाजूने निकाल देण्यासाठी त्याचा गैरवापर होऊ शकतो अशी कायमच त्यांच्यावर टीका होते.

न्या. खन्ना यांनी आजवर अनेक महत्त्वपूर्ण निकाल दिलेले आहेत. निवडणूक रोखे घटनाबाह्य ठरवणे, हा त्यातलाच एक महत्त्वाचा व क्रांतिकारक निकाल म्हणता येईल. राजकीय पक्षांना देणग्या देण्यासाठीची निवडणूक रोखे योजना ही घटनाबाह्य असल्याचा निकाल पाच सदस्यीय घटनापीठाने दिला होता, त्यामध्ये न्यायमूर्ती खन्ना यांचाही समावेश होता. निवडणूक प्रक्रियेमध्ये आयोगाबरोबरच राजकीय पक्ष, जनता यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश असतो. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडणे, ही लोकशाहीतील महत्त्वाची बाब मानली जाते. मात्र, सत्ताधारी वा एकूणच राजकीय पक्ष वेगवेगळ्या पळवाटा काढत असतात. न्या. खन्ना यांनी या माध्यमातून राजकीय पक्षांना दिलेला धक्का आवश्यकच म्हणायला हवा. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या कलम ३७० हटवण्याचा २०१९ मधील निर्णय वैध ठरवणाऱ्या पाच सदस्य खंडपीठांमध्येही खन्ना होते. त्याचबरोबर न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील पीठाने इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रामुळे मतदान केंद्र ताब्यात घेणे व बोगस मतदानाला आळा बसल्याचे सांगून ईव्हीएम वापरावर शिक्कामोर्तब केले होते. या निकालातील स्पष्टताही महत्त्वाची होय. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना झालेली अटक व त्यांच्या जामिनाचा मुद्दा मधल्या काळात वादग्रस्त ठरला होता. मात्र, केजरीवालांना लोकसभेच्या प्रचारासाठी सर्वप्रथम जामीन देण्याचा निकाल न्या. खन्ना यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर कलम २१ अन्वये घेतलेला जीवन जगण्याचा हक्क बाधित करण्यासाठी करता येणार नाही, हा निर्णयही अतिशय दूरगामी म्हणता येईल. खरं तर नवे सरन्यायाधीश खन्ना हे स्पष्ट भाषेत निवाडे लिहिण्यासाठी ओळखले जातात. त्यामुळे भविष्यातही त्यांच्याकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा असतील. त्यांच्या खंडपीठांसमोर याआधीच अनेक मोठी प्रकरणे प्रलंबित आहेत. बिहारमधील जातगणणेची वैधता हा एक महत्त्वाचा खटला होय. बिहार सरकारला जातनिहाय सर्वेक्षण करण्याचा अधिकार आहे की नाही, हे आता सर्वोच्च न्यायालयाला ठरवावे लागेल. त्यादृष्टीने न्या. खन्ना काय निर्णय देतात, याकडे देशाचे लक्ष असेल. मोदींवरील बीबीसीच्या लघुपटावरील बंदीला आव्हान देणाऱ्या प्रकरणाचीही त्यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. सर्वात महत्त्वाचा खटला म्हणजे शिवसेना तसेच राष्ट्रवादीतील फूट अर्थात महाराष्ट्रातील आमदार अपात्रता प्रकरण. अडीच वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप घडविण्यात आला. एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी गुवाहाटीची वाट धरत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार उलथवून टाकले. त्यानंतर महाराष्ट्रात सत्तांतर झाले. शिवसेना पक्ष व चिन्हदेखील शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून हिसकावून घेतले. याचाच पार्ट टू राष्ट्रवादीच्या बाबतीतही दिसून आला. हाच फॉर्म्युला वापरत अजितदादांनी राष्ट्रवादी फोडली व पक्ष तसेच पक्ष चिन्ह मिळवले. त्यामुळे शिवसेना व राष्ट्रवादी हे पक्ष नेमके कुणाचे, असा प्रश्न निर्माण झाला. वास्तविक सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या कार्यकाळात याचा निवाडा होणे अपेक्षित होते. महाराष्ट्रातील जनतेलाही तशी आस होती. प्रत्यक्षात महाराष्ट्राच्या निवडणुका जाहीर झाल्या, प्रचारालाही सुऊवात झाली, लवकरच मतदानप्रक्रियाही पार पडेल. पण अजूनही निर्णय लागू शकलेला नाही. ही शोकांतिकाच म्हटली पाहिजे. न्यायास विलंब म्हणजे न्याय नाकारणे, असे विचारवंत म्हणतात. अशा ज्वलंत प्रश्नांचा निवाडा तातडीने होत नसेल, तर हाच फॉर्म्युला वापरून कुठलाही पक्ष फोडता येऊ शकतो. म्हणूनच दूरगामी परिणाम करणाऱ्या घटनांबाबतचे निकाल लवकरात लवकर कसे लागतील, हे पाहिले पाहिजे. म्हणूनच भारतीय न्यायव्यवस्थेपुढे सर्वात मोठे आव्हान हे वेळेत न्यायदान करण्याचेच असेल. आमदार अपात्रता प्रकरणातील दिरंगाईमुळे आता जनतेच्याच कोर्टात काय तो याचा निकाल लागणार आहे. तरीही तांत्रिकदृष्ट्या न्यायालयाच्या निर्णयास महत्त्व असेल, हे विसरून चालणार नाही. आजवर अनेक क्लिष्ट प्रकरणांचा न्यायनिवाडा करणारे न्या. संजीव खन्ना याप्रकरणी न्याय करतील, अशी अपेक्षा असेल. याशिवाय निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती कायद्यालादेखील सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. या प्रकरणाचाही निवाडा न्यायमूर्ती खन्ना यांना करावा लागेल. न्या. खन्ना यांचे काका हंसराज खन्ना यांचा सरन्यायाधीशपदावरील हक्क तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी नाकारला होता. आणीबाणीच्या पर्वात त्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात अभूतपूर्व निकाल दिला होता. तथापि, त्यांच्यावर त्या वेळी अन्याय झाला. आता त्यांच्या पुतण्याची सरन्यायाधीशपदी निवड होणे, हा कालसुसंगत न्याय म्हणता येईल. प्रलंबित खटल्यांबरोबरच न्यायव्यवस्था व एकूणच प्रक्रियेत अजूनही अनेक त्रुटी राहून गेल्या आहेत. या त्रुटी कशा दूर करता येतील, यालाही आगामी काळात प्राधान्य द्यावे लागेल. न्या. संजीव खन्ना यांच्याकडून न्यायव्यवस्थेच्या सुधारणेच्या दृष्टीनेही पावले पडतील, अशी अपेक्षा आहे.

बालदिन

श्याम बसप्पा ठाणेदार

आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्मांबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली.

शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that Late Mr. SHAMIM UL HASAN NAQVI was the owner of Room No. D/5, Malwani Gopal Krishna Co.operative Housing Society Ltd., Plot No. 46, RSC-1, CTS No. 3525/A, Mhada, Malwani, Malad (west), Mumbai 400095 (hereinafter referred to as "the said Room"). Whereas after the death of Late Mr. SHAMIM UL HASAN NAQVI leaving behind children 1.MR. ZIYA NAQUI, 2.MRS. SABA NAQUI, 3.MRS. SEMEEN EJAZ NAQVI and wife Mrs. AAMENA KHATOON NAQVI, as legal heirs. And all children have released all their right, title and interest in favour of Mrs. AAMENA KHATOON NAQVI in respect of the said room. Any person having any claim whatsoever may send their objections/claims to me in writing together with supporting documents within 15 days at the following address:-

Advocate: Mr. Sudhir Kumar R. Dubey
Shop No. 56, Squatters Colony, Gate No.7, Malwani, Malad (West), Mumbai - 400095
Mobile No. 9920441160
Date: 14.11.2024

PUBLIC NOTICE

My client Mrs. Madhuri Mahesh Gupte is the Owner/Member of Industrial Premises bearing Unit No. 59 (Unit No. 3059), 03rd Floor, Nahar & Seth Ind. Estate, New Name - Bhandup Industrial Estate Co-Op Society Ltd, Pannalal Compound, L.B.S. Marg, Bhandup West, Mumbai - 400078 admeasuring about 16.50 Sq. Mtr Carpet Area bearing Share Certificate No. 0360 & Distinctive Numbers From 3591 to 3600 (Both Inclusive) and Notice is hereby Given to the Public that Original Agreement For Sale Dated 27.11.1989 in which the seller was Shri. Jayaram M. Shetty & Purchaser was Shri. Jogappa Shamraya Shetty, & Original Sale Agreement, Dated 18.10.1991 in which the seller was Shri. Jogappa Shamraya Shetty & Purchaser was Shri. R. A. Krishnan has been misplaced. Further Mr. Karsan Naran Gothi is purchasing the above-said premises from Mrs. Madhuri Mahesh Gupte.
Any person/s having any claim against or to the above mentioned Industrial premises or any part thereof, by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, maintenance, possession, tenancy, Inheritance, lease leave and license, lien or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing along with the supporting documents to the undersigned at the below mentioned address within a period of 14 (fourteen) days from the date of publication of this notice, failing which it shall be constructed as having been nonexistent | waived/ abandoned.
Date: 14/11/2024
SAURABH SINGH (Advocate High Court)
SINGH ENTERPRISES
Opp. Arihant Bank, LBS Marg, Bhandup (W), Mumbai - 400 078

New Markets Advisory Limited

Regd. Office: Om Metro, Chandrakunj, Plot No. 51, 2nd Floor, J.P. Road, Azad Nagar Metro Station, Next to Sony Mony, Andheri (W), Mumbai - 400058 | CIN: L74120MH1982PLC028648

Extract of the Standalone Un-audited Financial Results for the Quarter and Half Year Ended on 30/09/2024

(Amount in Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
		30/09/2024 (Unaudited)	30/06/2024 (Unaudited)	30/09/2023 (Unaudited)	30/09/2024 (Unaudited)	30/09/2023 (Unaudited)	31/03/2024 (Audited)
1	Total Revenue	1.65	0.75	1.22	2.40	1.90	2.98
2	Net Profit / Loss for the period (before Tax, Exceptional and / or Extraordinary items)	(0.38)	(2.08)	(6.04)	(2.46)	(8.08)	(12.84)
3	Net Profit / Loss for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items	(0.37)	(2.08)	(6.04)	(2.46)	(8.08)	(12.84)
4	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / Loss for the period (After tax) and Other Compreshensive Income(After tax)]	-	-	-	-	-	-
5	Equity Share Capital	124.00	124.00	124.00	124.00	124.00	124.00
6	Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) -						
	1. Basic:	(0.03)	(0.17)	(0.49)	(0.20)	(0.65)	(1.04)
	2. Diluted:	(0.03)	(0.17)	(0.49)	(0.20)	(0.65)	(1.04)

Note: The above is an extract of the detailed format of the Un-udited Financial Results for the Quarter and half year ended 30th September, 2024 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Format of the Financial Results is available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and Company's website.

For and on behalf of the Board
New Markets Advisory Limited
Sd/-
Yukti Sneh Suraj Arya
Director
DIN : 09756881

Date: 13.11.2023
Place: Mumbai

केमटेक इंडस्ट्रियल वाल्वस लिमिटेड

नोंदणीकृतकार्यालय: ५०३, सनराईजबिझनेसपार्क, प्लॉटक्र. बी-६८, रोड क्र-१६ किसन नगर-२, वागळेइंडस्ट्रियलइस्टेट, ठाणे-४००६०४.

सीआयएन: L29299MH1997PLC105108

Website: www.chemtechvalves.com Email: investors@chemtechvalves.com

दि. ३० सप्टेंबर, २०२४ ला संपलेल्या तिमाही साठी स्वतंत्र अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षचा उतारा अहवालाचा सारांश

(रु लाखात) (इपिएस वगळता)

अनु क्र	विवरण	संपलेल्या तिमाहीकरीता			सहामाहीकरीता		संपलेले वर्षाकरीता
		३०.०९.२०२४	३०.०६.२०२४	३०.०९.२०२३	३०.०९.२०२४	३०.०९.२०२३	३१.०३.२०२४
		(अलेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)
१.	कार्यचलनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	८५९.७९	१११११.६१	४५९.१४	१९७१.४०	१०४३.६६	३१७६.५४
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (करपूर्व, तोटा अपवादात्मक आणि /किंवा अनन्यसाधारण बाबींपुर्वी)	२००.१९	२९०.७६	४७.२६	४९०.९५	२०३.५६	४१६.९४
३.	कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, तोटा अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर)	२००.१९	२९०.७६	४७.२६	४९०.९५	२०३.५६	४१६.९४
४.	कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (करोत्तर, तोटा अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर)	१५६.२६	२१७.५०	५५.४६	३७३.७६	१९१.५५	४१५.४९
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी करोत्तर) व अन्य सर्वसामवेशक उत्पन्न	-	-	-	-	-	-
६.	समभाग भांडवल (प्रत्येकी रु १०/- चे)	१४६३.७३	१४६३.७३	११४८.७३	१४६३.७३	११४८.७३	१४६३.७३
७.	राखीव (पूर्व वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये निर्देशित मूल्यांकन राखीव वगळता)						२०२८.९०
८.	प्रति समभाग उत्पन्न (प्रत्येकी रु १०/-चे)						
	मूळ प्रति समभाग उत्पन्न (इपीस)	१.०७	१.४९	०.४८	२.५५	१.६७	३.५१
	सौम्य प्रति समभाग उत्पन्न (इपीस)	१.०७	१.४९	०.४८	२.५५	१.६७	३.३६

१. वरील माहिती म्हणजे भारतीय प्रतिभूति आणि विनिमय बोर्ड (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे सादर केलेल्या तिमाही आणि सहामाही वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा एक उतारा आहे. तिमाही आणि सहामाही विवित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसची वेबसाइट (www.bseindia.com) व कंपनीच्या वेबसाइट (www.chemtechvalves.com) वर उपलब्ध आहे.

२. केमटेक इंडस्ट्रियल वाल्व्ह लिमिटेड यांच्या ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व सहामाही वरील अलेखापरीक्षित परिणामांचा लेखापरीक्षण समितीने आढावा घेतला असून संचालक मंडळाने १३ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत ते मंजूर केले आहेत.

केमटेक इंडस्ट्रियल वाल्व्ह लिमिटेड च्या साठी
सही /-
हर्ष प्रदीप बडकूर
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी. आय. एन: ००६७६७१५

ठिकाण:- ठाणे
दिनांक :- १४.११.२०२४

SANMITRA COMMERCIAL LIMITED

Regd. Office: 13, Prem Niwas,, 652 Dr. Ambedkar Road,, Khar (West), Mumbai, Maharashtra, 400052
CIN: L17120MH1985PLC034963

Extract of the Standalone Un-audited Financial Results for the Quarter & Half Year Ending on 30/09/2024

(Amount in Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
		30/09/2024 (Un-audited)	31/06/2024 (Un-Audited)	30/09/2023 (Un-audited)	30-09-2024 (Un-audited)	30-09-2023 (Un-audited)	31/03/2024 (Audited)
1	Total income	11.63	0.33	3.86	11.96	5.08	25.58
2	Net Profit / Loss for the period (before Tax, Exceptional and / or Extraordinary items)	6.49	(2.86)	(4.01)	3.63	(5.96)	10.16
3	Net Profit / Loss for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items	6.49	(2.86)	(4.01)	3.63	(5.96)	10.17
4	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / Loss for the period (After tax) and Other Compreshensive Income(After tax)]	9.18	19.24	23.25	28.42	29.08	24.63
5	Equity Share Capital	110.00	110.00	110.00	110.00	110.00	110.00
6	Earnign Per Shares (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) -						
	1. Basic:	0.59	(0.26)	(0.36)	0.33	(0.54)	0.92
	2. Diluted:	0.59	(0.26)	(0.36)	0.33	(0.54)	0.92

Note: The above is an extract of the detailed format of the Un-udited Financial Results for the Quarter and half year ended 30th September, 2024 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Format of the Financial Results for the Quarter and half year ended 30th September,2024 are available on the Stock Exchange websites (www.bseindia.com) and Company's website.

For and on behalf of the Board
Sd/-
Prakash Shah
Director
DIN No-01136800

Date: 13.11.2024
Place: Mumbai

आधुनिक 'आर्यभट्ट'!

विजय कोष्टी

भारतामध्ये श्रीनिवास रामानुजन यांच्या तोडीचे काही जागतिक कीर्तीचे गणितज्ञ होऊन गेले. तथापि, दुर्दैवाने ते उपेक्षित राहिले आणि त्यांच्या कार्याची ओळख आणि महत्व यापासून देशवासी अनभिज्ञ राहिले. एके काळी गणितात अग्रस्थानी असणाऱ्या भारतात आज गणित एक कठीण आणि गंभीर विषय समजला जातो. महाराष्ट्रातील डहाणू चे रँग्लर परांजपे पारितोषिक विजेते आणि मजेशीर संख्यांचा शोध लावणारे द. रा. कापरेकर असोत वा भोजपूर, बिहार चे वसिष्ठ नारायण सिंह असोत, त्यांना दुर्लक्षित केल्याने त्यांच्या प्रतिभेचा योग्य लाभ घेता आला नाही, हेच खरे.

देशात संशोधनासाठी पूरक वातावरण नसल्यानेच देश आज संशोधन क्षेत्रात पीछाडीवर आहे. देशातील या वातावरणात सकारात्मक बदल करणे, हीच वसिष्ठबाबूंना श्रद्धांजली ठरेल. महान गणितज्ञ वशिष्ठ नारायण सिंह यांचा जन्म बिहारच्या भोजपूर जिल्ह्यातील बसंतपूर या गावात २ एप्रिल १९४२ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण नेतरहाट विद्यालयात पूर्ण झाले तर लहानपणापासूनच तल्लख बुद्धीचे असणाऱ्या वशिष्ठ यांना पाटणा कॉलेजमध्ये प्रथम वर्षीच बी.एस.सी. ऑनर्सची परीक्षा देण्यास परवानगी देण्यात आली होती. येथे ते 'वैज्ञानिकजी' नावानेच ओळखले जात होते. महाविद्यालयात शिक्षकांच्या अनेक चुका ते दाखवत. त्यामुळे प्राचार्यावर वशिष्ठ यांची स्वतंत्र परीक्षा घेण्याची वेळही आली होती, तथापि त्यात त्यांनी विक्रमी यश मिळविले. याच दरम्यान अमेरिकी गणितज्ञ जॉन केली पाटण्यात व्याख्यानासाठी आले असता त्यांनी काही गणिती कूटप्रश्न मांडले असता श्रोत्यांपैकी वशिष्ठ यांनी क्षणार्धात सर्व कूट प्रश्न सोडविल्याने चकित झालेल्या केली यांनी त्यांना अमेरिका भेटीचे निमंत्रण स्वखर्चाने दिले. त्यानंतर १९६९ मध्ये अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापिठातून त्यांनी 'रिप्रोडयुसिंग केर्नेल्स ॲण्ड ऑपरेटर्स विथ सायक्लिक व्हेक्टर' या विषयावर पीएचडी संपादन केली आणि याच विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक झाले. बर्केल विद्यापीठाने त्यांना 'जीनियसोंका जीनियस' असे म्हंटले होते. त्यानंतर नासा मध्ये ते असोसिएट सायंटिस्ट प्रोफेसर पदावर रुजू झाले.

१९७३ मध्ये ते वंदना राणी सिंह यांच्याशी विवाहबद्ध झाले, तथापि, त्यांचे वैवाहिक जीवन फार काळ टिकले नाही आणि वर्षभरातच ते पत्नीपासून विभक्त झाले. त्यानंतर अमेरिकेत न रमता ते भारतात आले आणि कानपूरच्या आयआयटी कॉलेज, टाटा मूलभूत संशोधन संस्था, मुंबई, भारतीय सांख्यिकी संस्था कोलकाता या संस्थांत त्यांनी काम केले. मात्र, पाच वर्षांनंतर त्यांना अचानक सीजोफ्रेनिया (व्यक्तिमत्त्व दुभंगाच्या) नावाच्या मानसिक आजाराने गाठले आणि त्यानंतर काही काळ ते बेपत्ता झाले. पाटण्यातील एका अपार्टमेंटमध्ये चाळीस वर्षे ते मनोदुभंगाने पछाडलेल्या अवस्थेत जीवन जगले. मात्र पुस्तके, पेन्सिल नेहमीच त्यांच्या सोबतीला होती. त्यांचा एकूणच जीवनप्रवास गणितज्ञ जॉन नॅश यांची आठवण करून देणारा आहे. तथापि, पाश्चात्त्य देशात प्रतिभावंतांची जी कदर होते ती आपल्याकडे होत नसल्याने त्यांच्यासारखा प्रज्ञावंत अकालीच झाकोळला गेला. नॅश यांनाही सीजोफ्रेनिया हा आजार होता. मात्र योग्य उपचारामुळे ते बरे झाले आणि त्यांना पुढे नोबेल सारखे पारितोषिक मिळाले.

प्रारूप–१

गुन्हेगारी प्रकरणांविषयी घोषणा

(माननीय सर्वोच्च न्यायालयाचे २५ सप्टेंबर, २०१८ रोजीचे (नागरी) क्रमांक ५३६/२०११

(पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन व इतर विरुद्ध भारत सरकार आणि इतर) या निर्णयानुसार)

उमेदवाराचे नाव आणि पत्ता : **विलास रघुनाथ पाटील,**
रा. – ३३३, रत्नदीप बंगलो, गोकुळ नगर, भिवंडी

राजकीय पक्षाचे नाव : **स्वतंत्र**

निवडणुकीचे नाव : **महाराष्ट्र विधानसभा २०२४**

मतदारसंघाचे नाव : **१३६ – भिवंडी पश्चिम विधानसभा**

मी, **विलास रघुनाथ पाटील** (उमेदवाराचे नाव), वरील निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून जनतेच्या माहितीसाठी माझ्या गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत पुढील माहिती जाहीर करीत आहे:

(अ) प्रलंबित गुन्हेगारी प्रकरणे

Sl. No.	न्यायालयाचे नाव	प्रकरण क्रमांक आणि तारीख	प्रकरणाची स्थिती	कलम (धारा) व कायद्याचे तपशील आणि गुन्ह्याचे संक्षिप्त वर्णन
१.	०१, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, भिवंडी	सत्र खटला क्र. १०६२/२०२३ (गुन्हा क्र. I १९/२०१८ निझामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी)	दोषारोप निश्चित करण्यासाठी प्रलंबित	भारतीय दंड संहिता १८६०,कलम १४३,१४७, ३५३,५०४, ५०६ बेकायदेशीर जमाव, दंगल, शासकीय कर्मचाऱ्याच्या कर्तव्यात अडथळा आणणे, शांततेचा भंग करण्याचा हेतु धमकी
२.	प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, भिवंडी	सारांश प्रकरण क्रमांक २३५/२००८ (गुन्हा क्रमांक II ६७/२००७, निझामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी)	जबाब नोंदविण्यासाठी प्रलंबित	भारतीय दंड संहिता १८६०,कलम १८८, शासकीय कर्मचाऱ्यांच्या आदेशाचे पालन न करणे
३.	नाही	नाही	नाही	नाही

(ब) गुन्हेगारी प्रकरणात दोषसिद्धीसंबंधी तपशील

अनुक्रमांक	न्यायालयाचे नाव व आदेश दिनांक	गुन्ह्याचे वर्णन आणि दिलेली शिक्षा	दिलेल्या शिक्षेची कमाल मर्यादा
लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही